ISSN 2231-1629
Knowledge Resonance

**IMPACT FACTOR 8.072**

January-June 2022- Vol. 11 No. 1

# भ्रष्टाचार : स्त्रियांचे हक्क, स्वरूप आणि वास्तव

**डॉ. विकास वैजिनाथ टाचले**

*ताराबाई शिंदे स्त्री अभ्यास केंद्र,*
*डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ,*
*औरंगाबाद-४३१००४.*

***प्रस्तावना :***

*जर तुम्ही तुमच्या ज्ञानाचा वापर करत नसाल तर त्याची किंमत शून्य आहे,[१] असे अंतोन चेकॉव्ह यांनी म्हटले आहे आणि ते खरे ही आहे. कारण लोकशाही शासन व्यवस्था असलेल्या देशातील समाज व्यवस्थेत अभिव्यक्ती स्वातंत्र्य हे गृहीतच असते. अशा वेळी जर आपण आपल्याला असलेल्या हक्क व कर्तव्याप्रती जागरूक नसू तर आपणच कपाळकरंटे ठरू. खरे तर ज्ञानाची पुजा, उदारता आणि विचारस्वातंत्र्याला जपणे हीच भारताची प्राचीन काळापासूनची परंपरा राहिली आहे. प्राचीन ज्ञानपरंपरेचे एक महान अभ्यासक तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांच्य मते, उपनिषदकाळापासून ते अस्तिक, नास्तिक दर्शने निर्माण होईपर्यंतचा सुमारे हजार वर्षाचा काळ हा विचार स्वातंत्र्याचाच काळ होता.[२] अशा खुल्या वैचारिक स्वातंत्र्य असलेल्या वातावरणात अनेक बाबींवर मोकळ्यापणाने चर्चा होत असे. वादविवाद होवून अनेक नव्या शास्त्र-विचारांचा जन्म होत असे. मुळातच मानव हा विचारशील व विवेकशील प्राणी आहे. त्यामुळे त्याला विचार करता आला पाहिजे, तो विचार त्याला व्यक्तही करता आला पाहिजे, आणि त्याची चिकित्साही झाली पाहिजे. इम्यैन्यआ कांटने म्हटल्याप्रमाणे आजचे युग हे चिकित्सेचे युग आहे, टीकेचे युग आहे, याच चिकित्सकतेमुळे गुरूत्वाकर्षण शक्तीचा शोध लागला, कार्ल मार्क्सला आर्थिक विषमतेचे मूळ शोधता आले.*

**भ्रष्टाचारची लागण:**

भ्रष्टाचाराची लागण स्वातंत्र्यप्राप्तीनंतर भारतातल्या सार्वजनिक क्षेत्रातील बहूतेक कार्यालयातील बहूतेक कर्मचा-यांना भ्रष्टाचाराच्या रोगाची लागण झालेली दिसते. हो रोग वेगाने पसरण्याची सरकारी कामकाजाचे झालेले अमर्याद विस्तारीकरण आणि सरकारचे नागरी समाज सोडून नोकरशाहीवरील वाढलेले परावलंबित्व ही प्रमूख कारणे आहेत. एकदा का नोकरशाहीची वाढ झाली आणि सरकारचे तिच्यावरील अवलंबित्व वाढले आणि त्यामुळे नियंत्रण कमी झाले की भ्रष्टाचाराला उत येतो, हे स्वयंसिध्द तत्व आहे. हे तत्व दुस-या महायुध्दाच्या काळापासून अधिक प्रकर्षाने आपले अस्तित्व दाखवून देत असल्याचे आपल्याला पाहायला मिळते.

नोकरशहा आणि राजकीय पुढारी यांच्यामार्फत होणा-या सर्वाधिक भ्रष्टाचारास ख-या अर्थाने आळा घालण्यासाठी सरकारच्या विविध खात्यांची पुनर्रचना करून एखादा विषय, समस्या किंवा कार्य ज्या अनेकविध उचितमार्ग पध्दतीतून क्रियान्वित होवून निर्णयाप्रत पोहचते त्या पध्दतीचे स्तर कमी करून ते सहज सुलभ करता येतील का किंवा किमान ते पारदर्श तरी करता येतील का हे पाहणे आज २१ व्या शतकात अत्यंत गरजेचे बनले आहे. कारण गेल्या कांही दिवसांत राज्यकारभारातील पारदर्शकता, जबाबदारीचे तत्व आणि सरकारी स्तरावरून सर्वसामान्यांना दिला जाणारा प्रतिसाद याबाबी अधिक चर्चेत असल्याचे दिसते. खरे तर लोकशाही शासनपध्दतीची हीच खरी नि मूलभूत वैशिष्ट्ये आहेत परंतू प्रत्यक्ष कामांऐवजी पेपरबाजी, घोषणाबाजी यांवर सण साजरा करणारा आपला भारत देश असल्याने या बाबी प्रत्यक्षात सर्वसामान्यांच्या जीवनात फारच क्वचित वेळाच आलेल्या आहेत. एवढेच नव्हेतर विधीमंडळातील गोंधळी चर्चेपेक्षाही जबाबदारीचे तत्व, पारदर्शकता आणि सरकारी नोकरदारांचा सर्वसामान्य जनतेला दिला जाणारा प्रतिसाद या बाबींची प्रत्यक्ष आणि प्रभावी अंमलबजावणी महत्वाची आहे. कारण याद्वारेच आपण नागरी समाजाचे लोक सरकारवर विश्वास ठेवून भ्रष्टाचाराला आळा बसल्याचे पाहू शकतो. खरे तर सरकारने आपल्याकडील कार्याचा आणि जबाबदारीचे हस्तांतरण जनतेकडे करावयास हवे कारण जनतेचे व्यवहार जनतेच्या हाती सोपविणे अधिक चांगले असते, हे आता सरकारलाही कळू लागले आहे. कारण केवळ कायदे करून भ्रष्टाचाराला आणि निवडणूकांतील काळ्या पैश्यांच्या वापराला, गुन्हेगारीला कधीच आळा बसत नाही.

**डॉ. आंबेडकरांचा इशारा :**

पाश्चिमात्य लोकशाही राष्ट्रांनी शेकडो वर्षांच्या संघर्षातून जो कांही लोकशाहीची मूल्ये मिळविली होती ती १५ ऑगस्ट १९४७ ला मिळविलेल्या स्वातंत्र्यांनंतर भारतीयांच्या ताटात वाढून भारतीय जनतेपुढे ठेवले. अथक संघर्षातून मिळालेल्या स्वातंत्र्यावर भारतीयांचा निसर्गदत्त अधिकार होता, परंतू प्रौढ मताधिकार, संपूर्ण लोकशाहीव्यवस्था या बाबी डॉ. आंबेडकरांमुळे बोनसच्या रूपात मिळाल्या. खरे तर भारतीय जनतेची मानसिकता ही राजेशाहीला पूरक वसाहतिक राजवटीच्या आधिन अशीच होती. एकीकडे आपण लोकशाहीच्या उदात्त परंपरांचे गोडवे गात होतो तर दुसरीकडे आपली मनोवृत्ती सरंजामशाही होती. सुरूवातीच्या काळात आणि आजही मोठ्या प्रमाणात पोलिसांनी गुन्हेगारांवर अंकुश ठेवण्याऐवजी बड्या-बड्या दादांना आश्रय दिला, जनतेची सेवा करण्याऐवजी तिला लुटायचे पातक नोकरशाहीने नेटकेपणाने केले. एकूणच काय तर लोकशाही संकेतांना सतत पायदळी तुडवले गेल्यामुळे सार्वजनिक जीवनाचे हवे तसे शुध्दीकरण होवू शकलेले नाही. भारतातील लोकशाही व्यवस्थेतील सरकार जनतेचे नव्हते. ना ते जनतेसाठी होते ना जनता ते चालवत होती, नाही जनतेचा त्यात सहभाग होता, असेच

म्हणावे लागेल. कारण लोकशाही संकेतांची काटेकोर अंमलबजावणी व्हावी किंवा करण्यात यावी यासाठी गांधीजीच्यानंतर अण्णा हजारेंच्या जनलोकपालासाठीच्या आंदोलनापर्यंत देशात लोकांचा नागरी समाजाचा (Civil Society) असा दबावगट कधी उभा राहिलाच नव्हता. जनता भ्रष्टाचाराने त्रस्त झाली होती परंतू मानसिक पातळीवर तिचे खच्चीकरण झालेले असल्यामुळे भ्रष्टाचा-यांना काबूत ठेवणे, त्यांना शिक्षा, अद्दल घडविणे अशक्यच होते. परंतू अलीकडच्या काळातील काही वर्षात वरील परिस्थितीत बरीच सुधारणा झालेली आपल्याला पाहायला मिळते. प्रौढ मतदानाच्या अधिकाराच्या अंमलबजावणीतून आणि देशात १९५२ पासून २०१९ पर्यंत झालेल्या १७ सार्वत्रिक (लोकसभा) निवडणूकांच्या अनुभवातून भारतीय सर्वसामान्य जनतेला राजकीय शहाणपण ब-याच प्रमाणात आलेले असून जनतेच्या, नागरी समाजाच्या (Civil Society) सशक्तीकरणाची प्रक्रिया हळूहळू आकार घेवू लागली आहे. आज राजकारणाबद्दलची जाण समाजातील शेवटच्या स्तरावरील माणसालाही असल्याचे त्याच्या प्रगल्भ राजकीय सहभागावरून दिसते. या बदलाला राजकीय व्यवस्थाही आता साथ देवू लागली आहे. एकीकडे टी. एन.शेषण नावाच्या एका माणसाने देशाच्या सार्वत्रिक निवडणूक प्रक्रियेत तोंडात बोट घालायला लावणा-या सुधारणा घडवून  आणल्या तर दुसरीकडे कठोर शिस्तीचे व न्यायप्रिय अशा काही मोजक्या न्यायधिशांनी भ्रष्टाचार करणा-या राजकीय नेत्यांच्या रात्रीची झोप उडवून दिली. त्याचवेळी या घडणा-या या सर्व घटनांना जनतेकडूनही खूप चांगला प्रतिसाद मिळत गेला. सार्वजनिक व्यवस्थेतील आणि राजकारणातील लाचखोरीकडे देशातील जनता आज त्वेषाच्या आणि निर्भत्सनेच्या भावनेने बघू लागली आहे. सोबतच निवडणूक आयोग आणि न्यायसंस्थेडूनही जनतेच्या या भावनांना सकारात्मक प्रतिसाद मिळाला. याचा अर्थ एका रात्रीत राजकारण्यांचे रूपांतर साधूसंतांमध्ये होईल असे समजण्याचे कारण नाही तर अशाप्रकारचे भ्रष्ट आचरण राजकीय पुढा-यांचे, नोकरशाहीचे अनैतिक वर्तन जनता यापुढे खपवून घेणार नाही, हा संदेश सर्वत्र गेला सध्याच्या भ्रष्टाचाराने माखलेल्या या व्यवस्थेत सुधारणा करावयाच्या असतील तर सर्वप्रथम आपल्याला नागरिकांना,नागरीसमाजाला सशक्त करावे लागेल, महिलांना सक्षम करावे लागेल,त्यांना असलेले हक्क उपभोगता येतील अशी परिस्थिती निर्माण केली पाहिजे आणि त्यासाठी संस्थात्मक संरचनेत बदल करावे लागतील. सार्वजननिक व्यवस्थेतल्या प्रशासकीय कामकाजाच्या संदर्भात पारदर्शकता असणे अतिशय गरजेचे आहे आणि शासनाच्या सर्व विभागातील कामकाज जर पारदर्शक असेल तर प्रशासनातील सर्व अधिकारी कर्मचारी त्या त्या खात्याचे मंत्री यांच्यामध्ये जबाबदारीची भावना आपोआपच येईल. सरकारी कामकाज (Confidential) गोपनियतेच्या नावाखाली नोकरशहांच्या भ्रष्ट, मनमानी कारभारावर आपोआपच पांघरण घातले जायचे. त्यामुळे सरकारच्या विश्वासार्हतेवर प्रश्नचिन्ह तर लागतोच शिवाय कारभारातील कायदेशीर निर्णयबाबत संशयही निर्माण होतो.

**उद्दिष्टये:-**

१. भ्रष्टाचाराला आळा घालणे.
२. स्त्रियांना त्यांचे हक्क व त्यांची स्थिती याची माहिती देणे.
३. राजकीय पक्षांचे दुटप्पी वागणे दाखवून देणे.

**गृहीतके :-**

१) स्त्रिया राजकारणात मोठया प्रमाणावर आल्यास भ्रष्टाचाराला आळा बसतो.
२) ब-याच स्त्रियांना त्यांचे हक्क माहित नसतात.
३) बहूतेक राजकीय पक्ष दुटप्पी वागतात.

**स्पष्टीकरण :-**

महाराष्ट्र राज्य हे भारतातील प्रगत, जागरूक, पुरोगामी राज्य म्हणून  तर ओळखेले जातेच शिवाय ते नेतृत्व देणा-या महिलांचें राज्य म्हणून देखील ओळखले जाते. प्रतिभाताई पाटील, अहिल्या रांगणेकर,मृणाल गोरे, शालिनीताई पाटील, सूर्यकांता पाटील, रजनी पाटील, मिनाक्षी पाटील, सरोज काशीकर, प्रभाताई झाडबुके, निर्मलाताई भोसले, सुशिला बलराज, इंदिराबाई कोटंबकर, कांता नलावडे, निर्मल मुंदडा जयवंतीबेन पटेल, निवेदिता माने, प्रमिलाकाकी चव्हाण, सरोजिनी बायर अशा अनेक महिलांनी महाराष्ट्राच्या राजकारणावर आपली छाप सोडली आहे. अलिकडच्या काळात पंकजा मुंडे, यशोमती ठाकूर, निर्मला गावित, प्रणिती शिंदे, विद्या ठाकूर, माधूरी मिसाळ, भारती लव्हेकर, मनिषा चौधरी, वर्षा गायकवाड या महिला आमदार चांगली कामगिरी करत आहेत. मार्च २०१९ मध्ये झालेल्या लोकसभेच्या निवडणूकीत महाराष्ट्रातील  ४८ खासदारापैकी पूनम महाजन, डॉ. प्रितम मुंडे, डॉ. हीना गावित, रक्षा खडसे, डॉ. भारती पवार, भावना गवळी, सुप्रिया सुळे आणि नवनीत कौर राणा या आठ महिला खासदार असले तरीही आत्तापर्यंतच्या निवडणूकांमधून उमेदवारी देताना बहूतेक सर्वच राजकीय पक्षांनी आपला हात आखडता घेतल्याचे दिसते. कारण ऑक्टोबर-२०१९ मध्ये झालेल्या महाराष्ट्रातील विधानसभा निपडणूकीसाठी एकूण उमेदवार सर्वच राजकीय पक्षांच मिळून ३२३७ उमेदवार होते त्यापैकी केवळ २३५ महिला उमेदवार होते.३ २०१४ च्या विधानसभा निवडणूकीत सर्वाधिक महिला उमेदवार २७७ होत्या त्या घटून २०१९ मध्ये २३५ वर आल्या. म्हणज महिलांना खरे तर स्थानिक स्वराज्यसंस्थांमधून ज्याप्रमाणे ५० टक्के प्रतिनिधित्व मिळाले आहे. तसे मिळावयास हवे, पण साधे ३३ टक्के् सुध्दा प्रतिनिधित्व देण्यासाठीची मानसिकता दिसली नाही. राजकीय पक्ष-निहाय निवडणूकीला (विधानसभा २०१९) उभ्या राहिलेल्या महिलांची संख्या पुढीलप्रमाणे-भारतीय जनता पार्टीने १७, शिवसेनेने ८, भारतीय राष्ट्रीय काँग्रेसने १५, राष्ट्रवादी काँग्रेसने -९ वंचित बहूजन आघाडीकडून १० महिलांना उमेदवारी देण्यात आली होती. १९६२ साली महाराष्ट्रातल्या पहिल्या विधानसेभेसाठीच्या निवडणूकीत २६४ जागांपैकी १९ महिला रिंगणात होत्या, १९६७ साली ९ महिला, १९७२ साली २१ महिला, १९७८ साली १३ महिला, १९८५ साली २८ महिला, १९९० च्या निवडणूकीत १७, १९९५ मध्ये -२८ १९९९ मध्ये १५७ महिला उमेदवारांना निवडणूकीत उभे करण्यात आले होते. यावरून

लक्षात येते की महिलांना घटनेकडून पुरूषांच्या बरोबरीचे सर्व प्रकारचे हक्क दिलेले असतानाही त्यांना आपल्या हक्कांपासून वंचित राहावे लागते. कित्येक ठिकणी महिलांना स्वतंत्रपणे आजही कार्य करू दिले जात नाही. म्हणजे स्त्रियांचे हक्क कागदोपत्री ठेवून आजही त्यांना न्याय हक्क दिले जात नाही. हीच राजकीय जीवनातील वस्तूस्थिती आहे. अशीच स्थिती थोडयाफार फरकाने देश पातळीवरही आहे, असे म्हणता येते.

**निष्कार्ष :-**

१) आजपर्यंत उघडकीला आलेल्या भ्रष्टाचारांत पुरूषांची संख्या जास्त आहे. त्यामुळे महिलांना राजकारणात जास्तीत जास्त संधी दिल्यास त्या भ्रष्टाचाराला थारा देत नाहीत.

२) स्त्रियांना आपल्या हक्काची जाणिव आहे, पण व्यवस्थेपुढे त्या हतबल ठरतात.

३) स्त्रियांना अधिक अधिकार देवून सक्षम करता येते.

शिफारशी :-

१. महिलांना स्वच्छ, नीटनेटका, कारभार पसंद असतो, त्यामुळे सर्वच राजकीय पक्षांनी महिलांना विधानसभा व लोकसभेत ५० टक्के आरक्षण देण्यासाठी मनापासून प्रयत्न करावेत.

२. राजकीय पक्षांनी दुटप्पीपणे वागणे सोडावे.

३. स्त्रियांनी पक्ष न पाहता महिलांना उमेदवारी देण्याचा आग्रह धरावा,तरच त्यांचे प्रश्न सोडवण्यासाठी राज्य व देश पातळीवरून खरेखुरे प्रयत्न होतील.

**समारोप :-**

एकंदरीत आपणांस असे म्हणता येते की सर्व प्रकारचे मानव अधिकार हे स्त्रियांचे अधिकार आहेत. किंवा स्त्रियांच्या ज्या मूळ गरजांशी संबंधित अधिकार आहेत त्यांना मानवी अधिकार म्हटल्यास ते अतिशयोक्ती ठरणार नाही. कारण मुळातच स्त्रिया ह्या आपल्या हक्कापेक्षा कर्तव्याला अधिक प्राध्यान्य देणा-या असल्याचे दिसते. घरापासून ते देशपातळीपर्यंत आजपर्यंत जेवढया सन्मानास स्त्रिया पात्र आहेत तो मानसन्मान त्यांना क्वचितच दिला जातो. कित्येक स्त्रियांना तर आपल्यालाही हक्क आहेत, हेच माहित नसते, त्याचा वापर करणे, उपभोग घेणे तर दुरच पण हे हक्क उपभोगणा-या स्त्रियांनी अतिरेकी वापर करून इतर सर्व स्त्रियांचे हक्क हिरावून घेतले जातील असे वर्तन करू नये, एवढीच माफक अपेक्षा. आंतराष्ट्रीय महिला दिनाच्या सर्व महिलांना खूप खूप शुभेच्छा.

**संदर्भ :-**

१. अंतोन चेकॉव्ह- १०.०१.२०२०, संपादकीय, दै. लोकमत- पृष्ठ क्रं.०६.

२. विचार स्वातंत्र्य चिंतेचा विषय, नरेंद्र चपळगावकर २९ सप्टेंबर २०१९ मंथन दैनिक लोकमत -पृष्ठ क्रं.०८.

३. १७-१०-२०१९लोकमत.-पृष्ठक्रं.०६.

४. एस. एस. गिल- अनुवाद-प्रकाश अकलोलकर- भ्रष्टांगण, पस्पूरे प्रकाशन मंदीर,मुंबई. जानेवारी-१९९९.

५. वर्तमानपत्रे

- दैनिक-दिव्यमराठी
- दैनिकसकाळ
- दैनिक लोकमत.